पीएच.डी.

संशोधन आराखडा

“बिदर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास”

सामाजिक शास्त्रे शाखेअंतर्गत, भूगोल विषयातील पीएच. डी.
(विद्या वाचस्पती) या पदवीकरिता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

पल्लवी कंटेप्पा कनाडे

(एम.ए., बी.एड., एम.फिल)

मार्गदर्शक

डॉ.सूर्यकांत नागनाथ कळसकर

(एम.ए., एम.फिल, पीएच. डी.)

कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर ग्रामीण
महाविद्यालय, हनेगाव ता.देगलूर जि.नांदेड

: भूगोल संशोधन केंद्र :

**महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर
४१३५१७ जि.लातूर.**

मार्च, २०१६

“बिदर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास”

१.१ प्रस्तावना :

भूगोलाच्या प्रमुख दोन शाखा आहेत १) प्राकृतिक भूगोल २) मानवी भूगोल. मानवी भूगोलामध्ये मानव व त्याच्या सभोवतालच्या पर्यावरणातील आंतरक्रियांचा अभ्यास केला जातो. मानवाच्या कार्याचा अभ्यास मानवी भूगोलाच्या विविध शाखेतून केला जातो. त्यापैकी पर्यटन भूगोल ही एक पर्यटन व्यवसायाचा विस्तार करणारी शाखा म्हणून पर्यटन भूगोलाकडे पाहिले जाते.

मानवामध्ये प्रवासाची आवड ही प्रत्येक कालखंडात दिसून येते. सुरुवातीच्या काळामध्ये मानवाची प्रवासासंबंधी कल्पना आजच्या कल्पनेपेक्षा वेगळी होती. पर्यटनाचा उद्देश त्या काळी केवळ आनंद मिळविणे एवढा नसून मुख्य उद्देश व्यापार हा होता. त्या काळातील अनेक पर्यटक हे तिर्थयात्रा करण्याच्या उद्देशाने धार्मिक पर्यटन स्थळांना भेटी देत होते. आज मात्र पर्यटन एकविसाव्या शतकातील सामाजिक व आंतरराष्ट्रीय पातळीवर दूरगामी परिणाम करणारी आर्थिक क्रिया म्हणून ओळखले जाते. प्राचीन मानव अजाणतेपणाने प्रवास करीत होता तर एकविसाव्या शतकातील मानव मनोरंजन, आवड, जाणून घेण्याची प्रवृत्ती, संशोधक म्हणून प्रवास करतो. अज्ञान प्रदेशाचा शोध घेणे, नवीन व चमत्कारिक प्रदेशाचा शोध घेणे, नवीन पर्यावरणातील बदल अनुभवणे, धार्मिकदृष्ट्या पर्वतीय प्रदेशांना भेटी देणे या हेतूने पर्यटक प्रवास करीत असतात.

भारतामध्ये आढळणारी विविधतेतील एकता पर्यटकाला काही ना काही देण्याची क्षमता या देशात आहे. येथील प्राचीन ऐतिहासिक वास्तुंचे सौंदर्य, शास्त्रोक्त लोकसंगीत, लोककला, नृत्य यांची प्रदीर्घ परंपरा भारताला लाभलेली आहे. भारतातील शेकडो धार्मिक पवित्र स्थळे जगभरातील पर्यटकांना साद घालतात. भारतासारख्या देशात पर्यटन हा व्यवसाय समृद्ध होत आहे. याच्या विकासाला पुरक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. म्हणून पर्यटनाच्या अभ्यासासाठी बिदर जिल्ह्यातील पर्यटन स्थळाची रूपरेषा या शोधप्रबंध आराखड्यात दर्शविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१.२ अभ्यास क्षेत्र :

कर्नाटक राज्याच्या ईशान्य भागात बिदर जिल्ह्याचे स्थान असून या जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°३५' उत्तर ते १८°२५' उत्तर आहे. तर रेखावृत्तीय विस्तार ७६°४२' पूर्व ते ७७°३९' पूर्व रेखावृत्त आहे. बिदर जिल्ह्याच्या पूर्वेला आंध्रप्रदेश राज्यातील रंगारेड्डी व निजामाबाद जिल्ह्याच्या सीमा येतात. या जिल्ह्याच्या उत्तर व पश्चिम सीमा महाराष्ट्र राज्यातील लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याच्या सीमेने वेढलेले आहे. बिदर जिल्ह्याचे दक्षिण सीमेवर कर्नाटक राज्यातील गुलबर्गा जिल्हा येतो. या जिल्ह्याचे हवामान कोरड्या स्वरूपाचे आहे. या प्रदेशात २०° से. ते ४२° से. तापमान आढळते तर वार्षिक सरासरी पर्जन्यमान सरासरी ८८५.८ मिलीमीटर आहे. येथून समुद्रसपाटीपासूनची उंची ६१५ मीटर येते. या बिदर जिल्ह्यातील प्रमुख नद्या गोदावरी, कृष्णा आहेत. जंगलव्याप्त जमिनीचे प्रमाण ४३६ चौरस कि.मी. आहे. इ.स.२०११ च्या जनगणनेनुसार बिदर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १७०३,३०० इतकी आहे. क्षेत्रफळानुसार लोकसंख्येची घनता ३१० इतकी आहे. तर लिंग गुणोत्तर प्रमाण ९५६ इतके आहे आणि एकूण साक्षरतेचे प्रमाण ७०.५१% आहे.

१.३ विषयाची निवड / अध्ययन क्षेत्राची निवड :

बिदर जिल्हा कर्नाटक राज्यातील ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा असून हा जिल्हा कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश राज्याच्या सिमावर्ती प्रदेशात येतो. तसेच बिदर जिल्हा हा दख्खनच्या पठारावरील प्रदेशाचे प्रतिनिधित्व करतो. या जिल्ह्यात जास्तीत जास्त धार्मिक स्थळे आहेत. ज्यांचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास होत आहे. बिदर हा जिल्हा सिमावर्ती भाग असल्यामुळे तेथे कोणत्या प्रकारची परिस्थिती निर्माण होते, पर्यटनाचा तेथील सामाजिक व आर्थिक जीवनावर झालेला परिणाम अभ्यासण्याच्या जाणीवेने मी “बिदर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास” हा विषय निवडला आहे.

१.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत अभ्यासासाठी खालील उद्दिष्ट्ये ठरवण्यात आली आहेत.

१)	बिदर जिल्ह्यातील पर्यटनस्थळांवर परिणाम करणाऱ्या भौगोलिक स्थितीचा अभ्यास करणे.

२)	पर्यटकांचा सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

३)	बिदर जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा विकास व सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

४)	अभ्यास क्षेत्रातील पुरेशा प्रमाणात असलेले पर्यटनस्थळ ओळखणे.

५)	अभ्यास क्षेत्रातील पर्यटनस्थळे व त्यांचे वितरण अभ्यासणे.

६)	बिदर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनस्थळांचा अभ्यास करणे.

७)	पर्यटकांना निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सांगणे.

८)	पर्यटकांचा पर्यटनस्थळावर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

**१.५	माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अभ्यासातील उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याच्या हेतूने आवश्यक ती आधारसामुग्री वापरली जाणार आहे. प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची आधारसामुग्री वापरली जाणार आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती विविध पर्यटनस्थळे व धार्मिक स्थळांना भेटी देऊन प्रश्नावलीद्वारे मिळवली जाणार आहे. माहिती घेताना आवश्यकतेनुसार नमुना निवड पद्धतीचा वापर केला जाणार आहे. तसेच दुय्यम स्वरूपाची माहिती जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जनगणना अहवाल, विविध संशोधन पुस्तिका, संदर्भग्रंथ, पर्यटनाशी संबंधित संशोधन लेख, मासिके व इंटरनेटवरील माहितीचा आधार घेतला जाणार आहे.

तसेच सर्व आकडेवारी स्पष्ट होण्यासाठी नकाशा, आलेख, आकृत्यांचा उपयोग केला जाणार आहे.

**१.६	साहित्य पुनरावलोकन :**

डॉ.घारपूरे विठ्ठल

डॉ.घारपूरे यांच्या ‘पर्यटन भूगोल’ या पुस्तकामध्ये पर्यटनाच्या व्याख्या, पर्यटनाची वैशिष्ट्ये, पर्यटनाचे भौगोलिक घटक, पर्यटनाचे प्रकार या घटकांसंदर्भात विशेष माहिती दिलेली दिसून येते.

डॉ.शिंदे एस.बी.

शिंदे यांनी 'पर्यटन भूगोल' या पुस्तकामध्ये पर्यटनाचा इतिहास, पर्यटन विकासाचे घटक, पर्यटनाचे वर्गीकरण, पर्यटनाच्या मूलभूत सुविधा, पर्यटनाचा आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय परिस्थितीवरील परिणाम, भारतातील धार्मिक व सांस्कृतिक पर्यटन इत्यादी घटकांचा अभ्यास केला आहे.

पाण्डेय अनुपम

यांनी आपल्या 'पर्यटन का स्वरूप' या पुस्तकामध्ये पर्यटनाचे स्वरूप, पर्यटनाची मूलतत्त्वे, भारतातील धार्मिक पर्यटन, पर्यटनाचा विकास इत्यादी घटकांचा अभ्यास केला आहे.

कुकाले प्रकाश गोविंदराव

यांनी 'नांदेड जिल्हयातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास' हा स्वा.रा.ती.म.वि. नांदेड यांना सादर केलेल्या अप्रकाशित शोधप्रबंधात नांदेड जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा भौगोलिक अभ्यास केला आहे.

१.७ प्रकरण रचना / मांडणी :

"बिदर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा भौगोलिक अभ्यास" हा अभ्यासविषय असून खालीलप्रमाणे प्रकरण मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले - संकल्पनात्मक आराखडा

१.१ प्रस्तावना

१.२ अभ्यास क्षेत्र

१.३ उद्दिष्ट्ये

१.४ माहिती संकलन

१.५ अभ्यास पद्धती

१.६ अभ्यास क्षेत्राची निवड

१.७ साहित्याचे पुनरावलोकन

प्रकरण दुसरे - अभ्यास क्षेत्रातील भौगोलिक, सामाजिक व आर्थिक घटकांचा आढावा

२.१ प्रस्तावना

२.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी
२.३ स्थान व विस्तार
२.४ भूपृष्ठरचना
२.५ नदीप्रणाली
२.६ हवामान
२.७ मृदा
२.८ वनस्पती
२.९ लोकसंख्या
२.१० कृषी
२.११ जलसिंचन
२.१२ उद्योगधंदे
२.१३ रस्ते व वाहतूक
प्रकरण तिसरे - पर्यटन स्थळांचे वर्गीकरण
३.१ प्रस्तावना
३.२ पर्यटनावर परिणाम करणारे घटक
३.३ तालुकानिहाय पर्यटनस्थळे
३.४ ग्रामीण व नागरी भागातील पर्यटनस्थळे
प्रकरण चौथे -बिदर जिल्ह्यातील पर्यटनस्थळ वितरण व विकास
४.१ प्रस्तावना
४.२ पर्यटनस्थळांच्या वाढीचा कल
४.३ पर्यटन स्थळांची दशकीय वाढ
४.४ ग्रामीण व शहरी पर्यटनाचा विकास
प्रकरण पाचवे - पर्यटनस्थळावरील सेवा सुविधा
५.१ वाहतूक सुविधा
५.२ दर्शन सुविधा
५.३ पाणी सुविधा

५.४ निवास व्यवस्था

५.५ खरेदी-विक्री सुविधा

प्रकरण सहावे - शासकीय योजनेचा पर्यटस्थळनिहाय अभ्यास

६.१ पर्यटन स्थळाविषयी शासकीय योजना

६.२ पर्यटनस्थळ विकास विषयक तरतुदी

६.३ बिदर जिल्ह्यातील पर्यटनस्थळांना केलेली मदत

प्रकरण सातवे - निष्कर्ष व शिफारशी

७.१ समस्या

७.२ निष्कर्ष

७.३ शिफारशी

७.४ उपाययोजना

संदर्भ सूची

१) प्रा.डॉ.विठ्ठल घारपुरे (२००१) - पर्यटन भूगोल, पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर

२) भूगोलशास्त्र परिभाषा कोश,(२००१): भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

३) भारतीय जनगणना अहवाल

४) बिदर जिल्हा गॅझेटिअर

५) बिदर जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन

६) www.googleearth.world, India, Karnataka, Bidar

७) www.bidar.nic.in.

संशोधक

पल्लवी कंटेप्पा कनाडे

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सूर्यकांत नागनाथ कळसकर

भूगोल विभाग

कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर ग्रा.महाविद्यालय,

हनेगाव ता.देगलूर जि.नांदेड